दैनिक **आरंभपर्व**
आरंभ एका नव्या पर्वाचा

पुर्ननिर्मितीतून प्रगतीकडे...!
**पुणे प्रहार**

पुणे प्रहार यांच्या सहयोगाने

**दै. आरंभ पर्व** आयोजित

# संपादक संमेलन

**लवकरच**

## प्रतिष्ठित संपादक करणार पत्रकारांना मार्गदर्शन

स्थळ : पुणे






## नानां पडद्यावर नसते तर देशात दर महिन्याला अराजकता निर्माण झाली असती : राज ठाकरे



"सामान्य माणसाच्या मनात सतत धुमसणारा राग, व्यवस्थेने केलेला अपमान, व्यवस्थेबद्दलची घृणा आणि वर्गसंघर्ष यांच्या अंतरंगातील 'प्रेशर कुकर'ची वाफ आपल्या अफाट ताकदीने पडद्यावर बाहेर काढणारा एक अद्वितीय चेहरा आज आपल्यातून कायमचा निघून गेला आहे. नाना पाटेकर किंवा अमिताभ बच्चन यांच्यासारख्या कलावंतांनी सामान्यांच्या मनातील ही धुमसती वाफ पडद्यावर दोन हात करून बाहेर काढली, म्हणून हा देश टिकला; अन्यथा या देशात दर महिन्याला अराजकता निर्माण झाली असती," अशा अत्यंत मार्मिक शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनावर आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर (ट्विटर) राज ठाकरे यांनी नाना पाटेकर यांच्या रंगभूमीपासून ते चित्रपटांपर्यंतच्या प्रवासाचे, त्यांच्या सामाजिक प्रभावाचे आणि अभिनयाच्या मानसशास्त्राचे एक प्रदीर्घ व विलोभनीय विश्लेषण मांडत त्यांना मनसेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. मुंबई शहर, मराठी रंगभूमी आणि हिंदी चित्रपटसृष्टी यांच्यातील अतूट धागा उलगडताना राज ठाकरे म्हणाले, "हिंदी सिनेसृष्टी म्हणजे मुंबई हे समीकरण जितके खरे, तितकेच मुंबई आली की इथली प्रायोगिक रंगभूमी, व्यावसायिक सिनेमा, झोपडपट्ट्या आणि चाळींमधून रोज अस्तित्व शोधणारा मध्यमवर्ग व कामगार वर्ग आला. गिरण्या बंद पडल्यानंतर उध्वस्त झालेला कामगार वर्ग, त्या नैराश्यातून जन्मलेले अंडरवर्ल्डचे साम्राज्य, विस्कटलेला सामाजिक सलोखा आणि त्यानंतर उदारीकरणानंतर विस्तारलेल्या मध्यमवर्गाच्या आकांक्षा—या प्रत्येक कालखंडाभोवती फिरणारे राजकारण नानांच्या कामातून थेट झळकले." "'हमीदाबाईची कोठी' या नाटकापासून सुरू झालेला हा प्रवास 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'अब तक छप्पन' ते अगदी 'नटसम्राट'पर्यंत सतत विस्तारत राहिला. या प्रत्येक टप्प्यावर काळजात अस्वस्थता उराशी बाळगून जगणारा सामान्य माणूस नानांनी कधी रंगभूमीवर तर कधी मोठ्या पडद्यावर तितक्याच ताकदीने जिवंत केला." सामान्य माणसाच्या मनातील संतापाचा मनोवैज्ञानिक वेध घेत ठाकरे यांनी लिहिले, "सामान्य माणसाच्या नशिबी सतत अपमान, लाचारी, वर्गसंघर्ष आणि शक्तिहीनता येते. हे सगळे त्याच्या मनात प्रेशर कुकरसारखे आत रटरटत, धुमसत राहते. कधीतरी घरातील किरकोळ भांडणांतून ते बाहेर पडते, नाहीतर आतच खदखदत राहते. नानांच्या अभिनयाकडे पाहताना हा सामान्यांच्या भावनांचा जळजळीत प्रेशर कुकरच आपण पाहतोय असा प्रत्यय यायचा." "लतादीदी, आशाताई, किशोर कुमार, रफी साहेब आणि अनेक संगीतकारांनी 60-70 वर्षे भारतीयांचे मन रिझवले; तसेच नाना पाटेकर आणि अमिताभ बच्चन यांनी सामान्यांच्या मनातील ही धुमसती आग अभिनयातून बाहेर काढून समाजाला एक वाट मोकळी करून दिली. म्हणूनच देशात शांतता राहिली, अन्यथा इथे दर महिन्याला अराजकतेचा भडका उडाला असता."

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०२९ • पुणे • शुक्रवार, दि. ०९ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# नानाची वाडी झाली सुन्न!

## नाना : सिंहगडाच्या मातीत रमला, आणि येथेच विसावला; ग्रामस्थांच्या भावना

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

अभिनय क्षेत्रातील लाडकं व्यक्तिमत्व आणि खऱ्याखुऱ्या आयुष्यातील 'नटसम्राट' अशी ख्याती असलेले ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अनंतात विलीन झाले. पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील त्यांच्या निवासस्थानी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या लाडक्या अभिनेत्याला डोळे भरून शेवटचा निरोप देण्यासाठी आणि अंतिम दर्शन घेण्यासाठी डोणजे गावात हजारोंचा जनसमुदाय लोटला होता. अश्रू ढाळत आणि जड अंतःकरणाने संपूर्ण महाराष्ट्राने या महान कलावंताला अखेरचा निरोप दिला. नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार याने त्यांना मुखाग्नी दिली. त्यावेळी 'नाना पाटेकर अमर रहे' अशा घोषणा उपस्थित असलेल्यांनी दिल्या. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं गुरुवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्यानं गोव्यात निधन झालं. मराठी रंगभूमी आणि मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतल्या या दिग्गज अभिनेत्यानं वयाच्या 75व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. नाना पाटेकरांच्या अकाली एक्झिटनं मनोरंजनसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. गोव्यातील निवासस्थानी नाना पाटेकरांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली एक्झिटमुळे मराठी रंगभूमीसह संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. निधनाचे वृत्त समजताच गोव्याहून नाना पाटेकरांचे पार्थिव विशेष एअर ॲम्ब्युलन्सद्वारे पुणे विमानतळावर आणण्यात आले. तिथून रस्तेमार्गे पार्थिव त्यांच्या डोणजे येथील निवासस्थानी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. नानांच्या निधनाची बातमी पसरताच अवघा महाराष्ट्र हळहळला आणि चाहत्यांनी डोणजे गावाकडे धाव घेतली. नाना पाटेकरांना अंतिम निरोप देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर डोणजे गावात उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, सुनील तटकरे, माधुरी मिसाळ, आमदार गोपीचंद पडळकर, अर्जुन खोतकर, रुपाली चाकणकर, सदाभाऊ खोत आणि उदय सामंत यांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले. अभिनेते मकरंद अनासपुरे, नागराज मंजुळे, नीना कुलकर्णी, प्रवीण तरडे, सुरेश वाडकर, पुरुषोत्तम बेर्डे, सुशांत शेलार, लेखक अरविंद जगताप यांच्यासह 'नाम' फाउंडेशनचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### “नाना पाटेकर माझी मुलाखत घेणार होते”



पाच दशकांहून अधिक काळ मराठी आणि हिंदी सिनेरसिकांचं निखळ मनोरंजन करणारे प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांचं गुरुवारी ८ ऑक्टोबर रोजी पहाटे निधन झालं. गोव्यातील राहत्या घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर अनेकांनी शोक व्यक्त केला असून त्यांच्या अंत्यसंस्कारालाही उपस्थित राहत त्यांचं अंत्यदर्शन घेतलं. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनीही त्यांना आदरांजली वाहिली असून त्यांच्याबरोबरची आठवण शेअर केली आहे. त्यांनी अंत्यदर्शनानंतर माध्यमांशी संवाद साधला. तुकाराम मुंढे म्हणाले, “नाना पाटेकर माझे अत्यंत जवळचे मित्र होते. आमचं वारंवार बोलणं व्हायचं. आमचा शेवटचा संवाद अवघ्या एका आठवड्यापूर्वीच झाला होता आणि आम्ही नेहमीप्रमाणेच गप्पा मारल्या होत्या. तो संवाद खूप सुंदर होता. त्यांनी माझ्या कुटुंबाबद्दल आणि माझ्या मुलांबद्दल विचारपूस केली, ते कसे आहेत हे विचारलं होतं. आणि त्यांचे शेवटचे शब्द होते, ‘लव्ह यू, बाळा.’ मला वाटतं की हे नानांचं एक वैशिष्ट्य होतं की, ते प्रत्येकावर प्रेम करायचे. “



ज्येष्ठ अभिनेते आणि माझे स्नेही, मित्र, मार्गदर्शक नाना पाटेकर यांचे पार्थिव आज पुण्यात स्वीकारले. राज्य सरकारतर्फे त्यांना यावेळी मानवंदना देण्यात आली. त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेत पुष्पचक्र अर्पण करुन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. एक हरहुन्नरी कलावंताला अखेरची मानवंदना देताना, श्रद्धांजली अर्पण करताना मन भरून आले होते.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रात अभिनयाची उत्तुंग शिखरे गाठणाऱ्या, संवादफेकीपासून मुद्राभिनयापर्यंत प्रत्येक बाबतीत स्वतःची स्वतंत्र शैली निर्माण करणाऱ्या व प्रखर सामाजिक जाणिवा जपणाऱ्या नाना पाटेकर यांचे अकल्पित निधन हा चित्रपटसृष्टीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि वैयक्तिक माझ्यासाठी फार मोठा धक्का आहे. गेल्याच आठवड्यात अनंत चतुर्थीच्या दिवशी नानांच्या पुण्याच्या घरी गणपती दर्शनाच्या वेळेस झालेली भेट ही शेवटची ठरली. नाना पाटेकर हे अभिनयाची एक जिवंत शाळा होते. 'नटसम्राट' चित्रपटातील त्यांचे संवाद आजही प्रेक्षकांच्या कानात घुमतात. चित्रपटाच्या पडद्यावर ते जितके भारदस्त असायचे, तितकेच खऱ्या आयुष्यात ते अत्यंत साधे आणि जमिनीवर असणारे व्यक्ती होते. नाना पाटेकर यांनी 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी केलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. समाजातील सामान्य माणसाशी त्यांची नाळ कायम जोडलेली होती.

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**



भारतीय चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर आपल्या अजोड, दमदार अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने मराठी तसेच भारतीय कलाविश्वाने एक हरहुन्नरी आणि संवेदनशील कलाकार गमावला आहे. नाना पाटेकर हे केवळ एक उत्कृष्ट अभिनेते नव्हते, तर अभिनयाचा अस्सल आविष्कार आणि संवेदनशील सामाजिक जाणिवांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. रंगभूमीपासून रुपेरी पडद्यापर्यंत आपल्या सहज आणि प्रभावी अभिनयाने त्यांनी अनेक व्यक्तिरेखा अजरामर केल्या. 'नटसम्राट', 'क्रांतिवीर', 'परिंदा' यांसारख्या कलाकृतींमधून त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर उमटवलेली अमीट छाप रसिकप्रेक्षकांच्या मनात सदैव कायम राहील. नाना पाटेकर आणि पवार कुटुंबातील आपुलकीच्या संबंधांचा उल्लेख करताना सुनेत्रा पवार यांनी नानांचे आदरणीय अजितदादांशी अतिशय जिव्हाळ्याचे, आपुलकीचे आणि स्नेहाचे संबंध होते. कौटुंबिक सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगात ते नेहमी पाठीशी उभे राहिले.

**- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**



# विद्यार्थ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका!

संपादकाय — विचार आजचा... दिशा उद्याची...

**पुणे ही केवळ विद्येची माहेरघर म्हणून ओळखली जाणारी नगरी नाही, तर लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मांडणाऱ्या चळवळींचीही भूमी आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध मागण्यांसाठी पुण्यात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन हे त्याच लोकशाही परंपरेचा भाग आहे. मात्र, आंदोलनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असेल किंवा सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असेल, तर प्रशासनाने त्याची दखल घेणेही तितकेच आवश्यक आहे. प्रश्न इतकाच आहे की, ही कारवाई संयमाने आणि संवेदनशीलतेने केली जाणार की बळाच्या जोरावर?**




एस. एम. जोशी पुलासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी आंदोलन सुरू असल्याने वाहतुकीवर परिणाम होत असेल, तर पोलिसांनी पर्यायी जागेचा आग्रह धरणे चुकीचे नाही. परंतु एमपीएससीची तयारी करणारे हे विद्यार्थी गुन्हेगार नाहीत. त्यांच्या हातात शस्त्रे नाहीत; त्यांच्या हातात पुस्तके आहेत. त्यांच्या मनात हिंसेची भावना नसून भविष्याबद्दलची चिंता आहे. त्यामुळे प्रशासनाने त्यांच्याकडे कायद्याच्या चौकटीत राहून, पण माणुसकीच्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे.

विनापरवानगी आंदोलन केल्याप्रकरणी विद्यार्थ्यांना नोटिसा देणे ही कायदेशीर प्रक्रिया असू शकते. परंतु ५१ विद्यार्थ्यांना नोटिसा, २९ खासगी शिकवणी व अभ्यासिका चालकांवर कारवाई अशा पद्धतीने प्रशासनाने कठोर भूमिका घेतली, तर परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांमध्ये आधीच अस्वस्थता असताना, पोलिसांचा प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती अत्यंत संवेदनशील ठरते.

विद्यार्थ्यांना हात लावणे हा तर सर्वांत शेवटचा पर्याय असला पाहिजे. आंदोलकांना जबरदस्तीने हटविण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणे आणि आंदोलनासाठी अधिकृत पर्यायी जागा उपलब्ध करून देणे, हा अधिक लोकशाही मार्ग आहे. प्रशासनानेही आपली ताकद दाखविण्यापेक्षा आपली संवादक्षमता दाखविण्याची ही वेळ आहे.

त्याचवेळी आंदोलक विद्यार्थ्यांनीही आपली जबाबदारी विसरता कामा नये. सार्वजनिक रस्ते अडविणे, नागरिकांना वाहतुकीच्या अडचणी निर्माण करणे किंवा कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल अशी वक्तव्ये करणे टाळले पाहिजे. आंदोलनाचा आवाज बुलंद असावा; पण तो कायद्याच्या चौकटीत असावा.

एमपीएससीच्या प्रश्नांवर सरकार, आयोग आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींमध्ये तातडीने चर्चा होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरण्याची वेळ का आली, त्यांच्या मनात कोणती नाराजी आहे, त्यांच्या मागण्यांपैकी कोणत्या रास्त आहेत आणि त्यावर काय निर्णय घेता येऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. पुणे पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणात संयम, संवाद आणि संवेदनशीलता या तीन गोष्टींचा आधार घ्यावा. एका बाजूला वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्था सांभाळताना दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांचा विश्वासही जपावा. कारण आज आंदोलन करणारा विद्यार्थी उद्याचा अधिकारी असू शकतो. त्याच्या मनात प्रशासनाविषयी आदर निर्माण करायचा असेल, तर प्रशासनानेही आज त्याच्याशी आदराने वागणे आवश्यक आहे.

लाठीने आंदोलन थांबविता येईल; पण विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न थांबविता येणार नाहीत. म्हणूनच पुणे पोलिसांनी कठोरतेपेक्षा संयमाचा, दडपशाहीपेक्षा संवादाचा आणि संघर्षापेक्षा समन्वयाचा मार्ग स्वीकारावा. विद्यार्थ्यांना हात लावू नका; त्यांचा हात हातात घेऊन त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढा. हीच या आंदोलनातून प्रशासनाला मिळणारी खरी कसोटी आहे.

# दुष्काळात कारखान्यांना पाणी

## पिण्यासाठी आणि जनावरांसाठी साठा कुठे?

- **जवळगाव मध्यम प्रकल्पातील पाणी उपसा तात्काळ थांबवण्याची नागेश चव्हाण यांची मागणी**
- **प्रशासनाला आंदोलनाचा इशारा**



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यात दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झालेली असताना जवळगाव मध्यम प्रकल्पातील पाणी कारखाने आणि खाजगी व्यवसायांसाठी उपसा केले जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश शेठ चव्हाण यांनी केला आहे. एकीकडे पिण्यासाठी तसेच जनावरांसाठी पाणीसाठा राखून ठेवण्याची गरज असताना कारखान्यांसाठी पाणी दिले जात असेल, तर प्रशासनाने याची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे त्यांनी केली आहे. जवळगाव मध्यम प्रकल्पातील उपलब्ध पाण्यावर परिसरातील अनेक गावांतील नागरिक, शेतकरी आणि पशुधन अवलंबून आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने भविष्यातील पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणे गरजेचे असल्याचे चव्हाण यांनी म्हटले आहे. "दुष्काळी परिस्थितीत पिण्यासाठी आणि जनावरांसाठी पाणीसाठा राखून ठेवणे आवश्यक असताना कारखाने व खाजगी व्यवसायांसाठी पाणी उपसा कसा केला जात आहे?", असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचा वापर करताना प्रथम पिण्याचे पाणी, जनावरांची गरज आणि त्यानंतर शेती यांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पाण्याचा उपसा कोणाच्या परवानगीने आणि कोणत्या नियमांनुसार केला जात आहे, याची प्रशासनाने चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट करावी, अशी मागणी चव्हाण यांनी केली. नियमबाह्य पाणी उपसा होत असल्याचे चौकशीत आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी. तसेच दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जवळगाव प्रकल्पातील पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल न घेतल्यास शेतकरी व नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागेश शेठ चव्हाण यांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### टू बॅलन्सकडून 'हर लाईफ का बॅलन्स' डॉक्युसिरीजचे प्रीमियर

**गुरुग्राम (आरंभ पर्व) : टू बॅलन्स या एआय-सक्षम डिजिटल लेंडिंग प्लॅटफॉर्मने तीन भागांची डॉक्युसिरीज 'हर लाईफ का बॅलन्स' लॉंच केली आहे, जी जिओहॉटस्टारवर स्ट्रीम होत आहे. ही सिरीज विविध क्षेत्रांतील टू बॅलन्सच्या सहा ग्राहकांच्या प्रवासावर आधारित आहे. या सिरीजमध्ये वेळेवर मिळालेल्या कर्जामुळे त्यांना व्यवसाय, शिक्षण आणि वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कशी मदत झाली, हे दर्शवण्यात आले आहे. टू बॅलन्सचे फाउंडर आणि सीईओ चार्ली ली म्हणाले, "भारताने व्यक्तींना औपचारिक आर्थिक यंत्रणेशी जोडण्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे. यापुढील पाऊल म्हणजे आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्यांना कर्जाची उपलब्धता सुलभ करून देणे आणि या पुढील वाटचालीत योगदान देताना आम्हाला अभिमान वाटतो. 'हर लाईफ का बॅलन्स'मध्ये दाखवलेले आमचे सहा ग्राहक दैनंदिन आव्हानांवर मात करत व्यवसाय उभारणी करत आहेत, कुटुंबाला आधार देत आहेत आणि आपल्या भविष्याचे नियोजन करत आहेत. त्यांच्या या कहाण्या भारतातील लाखो व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षांना सादर करतात. या सिरीजच्या माध्यमातून आमचे ग्राहक आणि त्यांच्या जीवनात पुढे जाण्यासाठी सुरू असलेला त्यांचा प्रवास या दृष्टिकोनातून 'फायनान्स फॉर ऑल' प्रत्यक्षात उतरवण्याचे आमचे उद्दिष्ट आहे."**

### पोगोकडून भारतातील सर्वात मोठ्या ॲनिमे क्रॉसओव्हरचे अनावरण




**मुंबई (आरंभ पर्व) : पोगो या वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या फ्लॅगशिप किड्स एंटरटेनमेंट ब्रँडने भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या ॲनिमे-प्रेरित क्रॉसओव्हरचे घोषणा केली – राइज ऑफ अंशक्स: हिरोज ऑफ डेस्टिनी. पहिल्यांदाच भारतातील दोन सर्वात मोठे देसी हिरो छोटा भीम आणि लिटिल सिंघम एकाच कॉस्मिक ॲनिमे विश्वात पाऊल ठेवत आहेत – चाहते ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो हाच जबरदस्त टीम-अप! प्रकाश आणि अंधार यांच्यातील तीव्र होत चाललेली लढाई त्यांचे जग गिळंकृत करू पाहत असताना हे दोन्ही आयकॉन एकत्र येतात आणि त्यांच्यासोबत पोगोच्या सर्वात मोठ्या सुपरहिरोंच्या खांद्याला खांदा लावून उभे राहणारे नव्या नायकांचे एक संपूर्ण नवे पथकही सामील होते. ११ ऑक्टोबर २०२६ पासून दर रविवारी दुपारी १ वाजता, नशीब, मूलतत्त्वांची शक्ती आणि विश्वाचे भवितव्य पणाला लागलेल्या या महागाथेचा प्रीमियर होणार असून, ती हिंदी, इंग्रजी, तमिळ, तेलगू, मल्याळम, कन्नड आणि मराठी अशा विविध भाषांमधील चाहत्यांसाठी उपलब्ध असेल. हा पोगोचा आतापर्यंतचा सर्वात मोठा पॉवर-अप आहे. एक तासाचा प्रत्येक भाग नेहमीच्या टून एपिसोडपेक्षा एखाद्या चित्रपट-गाथेच्या अधिक जवळ जाणारा असेल. त्यामुळे कथेला मोठे आर्क, अधिक उत्कंठावर्धक संघर्ष आणि छोटा भीम, लिटिल सिंघमचे चाहते तसेच सर्व ॲनिमेप्रेमी ज्याची अपेक्षा करतात, तसे सखोल विश्व-निर्माण साकारण्यासाठी पुरेसा अवकाश मिळेल.**

### प्रथमच 'ट्रायोरा'चा अनोखा संगम

**पुणे (आरंभ पर्व) : पुण्याच्या फॅशन, विवाह आणि उत्सवी विश्वात प्रथमच तीन प्रतिष्ठित ब्रँड्स एका व्यासपीठावर येत असून, 'ट्रायोरा – व्हेन थ्री लेगसीज मीट' या दोन दिवसीय भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राया एथनिक, पल्लोड आणि राठोड ज्वेलर्स हे तीन नामांकित ब्रँड्स प्रथमच एकत्र येत असून, ११ आणि १२ ऑक्टोबर रोजी शेरेटन ग्रँड, पुणे येथे हा विशेष सोहळा रंगणार आहे. पुण्यातील सण-समारंभ आणि विवाहसोहळ्यांच्या फॅशनमध्ये आपापल्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केलेल्या या तिन्ही ब्रँड्सच्या कलाकुसरीचा आणि परंपरेचा अनोखा संगम 'ट्रायोरा'मध्ये पाहायला मिळणार आहे.**

# जुन्नरला 'जश्न-ए-तालीम-ओ-तरबियत २०२६' उत्साहात संपन्न

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जुन्नर येथील अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे उम्मत की खिदमत फाउंडेशनच्या वतीने 'जश्न-ए-तालीम-ओ-तरबियत २०२६' हा वार्षिक शैक्षणिक सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

उच्च शिक्षणाची प्रेरणा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित हा सोहळा ५ ऑक्टोबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मंडळाचे सदस्य ॲड.अहमदखान पठाण, मोटिवेशनल स्पीकर मुबीन तांबोळी, जिल्हा वक्फ अधिकारी सुहेल सैय्यद,डॉ. पंजाबराव कथे, हाजी शफी काझी, राजू इनामदार, हाजी फिरोज पठाण, नगरसेवक वजीद इनामदार, आकिब इनामदार, राहीन कागदी, मुमताज पटेल, साकी सय्यद यांच्यासह तौसिफ़ अत्तार, सोहेल शेख तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी, पालक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी दहावी ,बारावी, पदवी, पदव्युत्तर आदी परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तब्बल ७२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. समाजातील वंचित घटकांसाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी 'समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. तसेच विशेष आकर्षण ठरलेल्या 'प्रिन्सिपल जोहरा शेख युवा रत्न पुरस्कार' अंतर्गत वैद्यकीय तसेच झूओलोजी विषयात पीएचडी सारख्या उच्च शिक्षणातील उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

प्रेरणादायी वक्ते प्रा. मुबीन तांबोळी यांनी विद्यार्थ्यांना "खुद की कहानी खुद लिख" या संकल्पनेतून प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून आत्मविश्वास, मेहनत आणि सातत्याच्या बळावर आपले भविष्य घडवावे, असे आवाहन केले.

'जश्न-ए-तालीम' हा केवळ सत्काराचा कार्यक्रम नसून, गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून समाजातील इतर विद्यार्थ्यांमध्येही शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणारे व्यासपीठ आहे अशी भावना समीर काझी यांनी व्यक्त केली. उम्मत की खिदमत फाउंडेशनच्या वतीने सातत्याने राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि सहकार्य दिले जात असल्याचेही त्यांनी कौतुक केले.

प्रास्ताविक व परिचय मुख्य प्रवर्तक गुलामनबी जोहरा युनूस शेख यांनी केले. मेहबूब काझी आणि सना शेख यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उम्मतचे अब्दुल मुबीन शेख,अल्ताफ इनामदार,अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे अध्यक्ष हाजी कुद्दूस बेग वं प्रा. इंतेखाब शेख आणि प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकवृंद तसेच स्थानिक नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# पदवीधरांच्या प्रश्नांसाठी ॲड. एम. डी. देशमुख मैदानात




- **अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल**
- **विधानपरिषदेत 'स्वतंत्र रोजगार नीती'चा मुद्दा मांडणार**
- **पाच जिल्ह्यांतील पदवीधरांच्या प्रश्नांना प्राधान्य**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी ॲड. एम. डी. देशमुख यांनी ६ ऑक्टोबर रोजी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. पदवीधरांच्या प्रश्नांना पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन स्वतंत्र आणि प्रभावी व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रोजगार, कौशल्यविकास, उद्योजकता आणि पदवीधरांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. या जिल्ह्यांतील सुशिक्षित युवक-युवतींचे प्रश्न, रोजगाराच्या मर्यादित संधी, व्यावसायिक विकास आणि शिक्षणानंतर निर्माण होणाऱ्या अडचणी विधानपरिषदेत प्रभावीपणे मांडण्याचा निर्धार ॲड. देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

कायद्याच्या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, ग्राहक न्यायालयात माजी न्यायाधीश म्हणून बजावलेली संधी मिळाल्यास सभागृहात 'स्वतंत्र रोजगार नीती' हा विषय पहिल्यांदा उपस्थित करून त्यावर व्यापक धोरणात्मक चर्चा घडवून आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सुशिक्षित युवकांसाठी रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यासाठी राज्याला दीर्घकालीन, सर्वसमावेशक आणि स्वतंत्र रोजगार धोरणाची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कोठडीत मृत्यू झाल्यास वारसांना ५ लाखांची नुकसानभरपाई

# दोषी पोलिसांकडूनच होणार वसुली

- **५० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्वासाठी ४ लाख, कमी अपंगत्वासाठी २ लाखांची मदत**
- **३० दिवसांत चौकशी अहवाल सादर करणे बंधनकारक**



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पोलीस कोठडीत होणारे मृत्यू, मारहाण, मानसिक किंवा शारीरिक छळाच्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पोलीस कोठडीत एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, तसेच पोलिसांच्या मारहाण, अत्याचार अथवा दबावामुळे व्यक्तीला कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास संबंधित पीडित किंवा त्यांच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या धोरणानुसार कोठडीतील मृत्यूच्या प्रकरणात दोषी अधिकारी किंवा कर्मचारी आढळल्यास केवळ नुकसानभरपाई देऊन प्रकरण थांबणार नाही, तर संबंधितांवर फौजदारी कारवाईही करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे पीडित कुटुंबाला देण्यात येणारी नुकसानभरपाई दोषी अधिकारी किंवा कर्मचाऱ्याच्या वेतनातून, निवृत्तीवेतनातून किंवा त्यांच्या मालमत्तेतून वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे कोठडीत असलेल्या व्यक्तीच्या सुरक्षिततेबाबत पोलिसांवर अधिक जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता आहे.

पोलिसांच्या ताब्यात किंवा कोठडीत असलेल्या व्यक्तीचा मारहाण, शारीरिक अथवा मानसिक छळ, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे चौकशीत सिद्ध झाल्यास संबंधित व्यक्तीच्या वारसदारांना पाच लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. कोठडीतील मृत्यूच्या घटनांमध्ये वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी वैद्यकीय तपासणी, संबंधित कागदपत्रे, परिस्थितीजन्य पुरावे तसेच मृत्यूच्या कारणांची तपासणी केली जाणार आहे. दोष निश्चित झाल्यानंतर नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. कोठडीतील मारहाण किंवा शारीरिक-मानसिक छळामुळे संबंधित व्यक्तीला कायमस्वरूपी अपंगत्व आले असल्यास त्यासाठीही नुकसानभरपाईची तरतूद करण्यात आली आहे.

५० टक्क्यांपेक्षा अधिक कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास चार लाख रुपये, तर ५० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व आल्यास दोन लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. अपंगत्वाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी अधिकृत वैद्यकीय तपासणी आणि सक्षम वैद्यकीय प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचा आधार घेतला जाणार आहे. त्यामुळे नुकसानभरपाई देताना केवळ आरोपांवर नव्हे, तर वैद्यकीय आणि प्रशासकीय नोंदींच्या आधारे निर्णय घेण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

या धोरणात काही अपवादही निश्चित करण्यात आले आहेत. कोठडीत असताना व्यक्तीचा वयोमानानुसार किंवा कोठडीत दाखल होण्यापूर्वीपासून असलेल्या जुन्या असाध्य आजारामुळे नैसर्गिक मृत्यू झाल्यास या धोरणांतर्गत नुकसानभरपाई मिळणार नाही.

तसेच अचानक उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झाल्यासही या तरतुदी लागू होणार नाहीत. वैद्यकीय उपचार घेण्यास संबंधित व्यक्तीने स्वतःहून नकार दिला किंवा अवाजवी मागण्यांसाठी उपोषण केल्यामुळे मृत्यू झाल्यासही नुकसानभरपाई देण्यात येणार नाही. याशिवाय कोठडीतून पलायन करण्याचा प्रयत्न करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास त्या प्रकरणालाही नुकसानभरपाईच्या तरतुदीतून वगळण्यात आले आहे.

चौकशीत पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. त्याचबरोबर पीडित कुटुंबाला देण्यात आलेली नुकसानभरपाई दोषी व्यक्तीच्या वेतनातून, निवृत्तीवेतनातून किंवा मालमत्तेतून वसूल करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

यामुळे कोठडीतील व्यक्तींशी वागताना कायदेशीर नियमांचे पालन करण्याची जबाबदारी अधिक स्पष्ट होणार आहे.

कोठडीतील मृत्यू किंवा गंभीर छळाची घटना घडल्यानंतर संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेणे आवश्यक राहणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांना ३० दिवसांच्या आत चौकशीचा सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर करावा लागणार आहे. चौकशीदरम्यान वैद्यकीय अहवाल, मृत्यूचे कारण, अपंगत्वाचे प्रमाण, संबंधित व्यक्तीची कोठडीत दाखल होण्यापूर्वीची वैद्यकीय स्थिती तसेच घटनेशी संबंधित इतर बाबी तपासल्या जाणार आहेत. नुकसानभरपाई निश्चित करताना वैद्यकीय तपासणी आणि प्रमाणपत्रांना महत्त्व देण्यात आले आहे. विशेषतः अपंगत्वाच्या प्रकरणांमध्ये त्याचे प्रमाण निश्चित करण्यासाठी अधिकृत वैद्यकीय प्रक्रियेचा अवलंब केला जाणार आहे. यामुळे नुकसानभरपाईच्या दाव्यांमध्ये पारदर्शकता राखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मृत्यू अथवा अपंगत्वाचे कारण पोलिसांच्या छळाशी संबंधित आहे की अन्य नैसर्गिक किंवा वैद्यकीय कारणामुळे, याची तपासणी प्रक्रियेत निश्चित केली जाणार आहे. कोठडीतील व्यक्तींच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित पोलिस यंत्रणेवर असते. त्यामुळे नव्या धोरणामुळे कोठडीत होणाऱ्या मारहाणीच्या घटना, अनावश्यक दबाव, मानसिक छळ किंवा निष्काळजीपणाच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांवर अधिक प्रशासकीय आणि कायदेशीर जबाबदारी येणार आहे.

### नुकसानभरपाईचे स्वरूप

- कोठडीतील मृत्यू : ५ लाख रुपये
- ५० टक्क्यांपेक्षा अधिक कायमस्वरूपी अपंगत्व : ४ लाख रुपये
- ५० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व : २ लाख रुपये
- चौकशी अहवाल : ३० दिवसांत सादर करणे बंधनकारक
- दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर : फौजदारी कारवाई
- नुकसानभरपाईची वसुली : वेतन, निवृत्तीवेतन किंवा मालमत्तेतून

### दोषी पोलिसांच्या खिशाला बसणार फटका

या धोरणातील महत्त्वाची बाब म्हणजे नुकसानभरपाईची रक्कम सरकारी तिजोरीतून देऊन प्रकरण संपविण्याऐवजी दोषी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हर्षदा देशमुख-जाधव यांचा शक्तीप्रदर्शनात उमेदवारी अर्ज दाखल

- महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अधिकृत उमेदवार; पदवीधरांच्या प्रश्नांवर ठोस कृतीचा अजेंडा

पुणे (आरंभ पर्व) : पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) अधिकृत उमेदवार हर्षदा देशमुख-जाधव यांनी मंगळवारी पुणे विधानभवन येथे मोठ्या शक्तीप्रदर्शनात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. पदवीधरांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने न देता ठोस कृतीचा अजेंडा घेऊन निवडणूक रिंगणात उतरल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. उमेदवारी अर्ज दाखल करताना महाविकास आघाडीतील विविध घटक पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोहन जोशी, आमदार सतेज (बंटी) पाटील, आमदार विश्वजीत कदम, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी महापौर अंकुश काकडे, माजी सनदी अधिकारी प्रभाकर देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष वसंत मोरे, तसेच के. जे. इन्स्टिट्यूटचे संस्थापक कल्याण जाधव यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### अरुंधती फाउंडेशनतर्फे सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे १० ऑक्टोबरला आयोजन



पुणे (आरंभ पर्व) : सर्वपित्री अमावस्येनिमित्त आपल्या पूर्वजांच्या स्मृतींना तसेच धर्मरक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यासाठी अरुंधती फाउंडेशन, पुणे आणि श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक तर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अरुंधती फाउंडेशनचे अध्यक्ष हिमांशु गुप्ते यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे आदित्य गुप्ते उपस्थित होते. शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सदाशिव पेठेतील एस. पी. कॉलेज कॅम्पस येथील लेडी रमाबाई हॉल येथे हा कार्यक्रम होणार आहे. सर्वपित्री अमावस्येच्या पवित्र दिवशी पूर्वजांच्या स्मृतींना अभिवादन करण्याबरोबरच देश, धर्म आणि मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या असंख्य वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सदानंद गोविंद फडके राहणार असून प्रमुख निमंत्रित म्हणून स्वाती गोयल शर्मा उपस्थित राहणार आहेत. यावेळी 'जेम्स ऑफ बॉलिवूड' या विषयावर स्वाती गोयल शर्मा यांचे विशेष ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरणही होणार आहे. रमेश भागवत, विश्वस्त, श्री देवदेवेश्वर संस्थान, पुणे हे सहकार्य करणार आहेत. अरुंधती फाउंडेशनचे आयोजक हिमांशू गुप्ते आणि आदित्य गुप्ते यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाला कर्णाळा चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे, अरुंधती फाउंडेशन आणि कै. श्रीकांत लिंगायत मेमोरियल ट्रस्ट, पुणे यांचे सहकार्य लाभले आहे.

### बंधन म्युच्युअल फंडची नवी मोहीम

मुंबई (आरंभ पर्व) : महिन्याचा शेवट आणि पगार जमा होण्याचा दिवस यांच्यातील खास नाते प्रत्येकाच्या परिचयाचे आहे. पगार खात्यात जमा झाल्याची सूचना मिळताच चेहऱ्यावर उमटणारे मोठे हास्य हीच भावना केंद्रस्थानी ठेवत बंधन म्युच्युअल फंडाने 'बत्तीस वाली स्माईल' ही नवी जाहिरात मोहीम सादर केली आहे. 'सॅलरी वाला प्लॅन' या मोहिमेच्या पुढील भागाच्या स्वरूपात सादर करण्यात आलेल्या या चित्रफितीत विनोद आणि दैनंदिन जीवनातील सहज परिचित प्रसंगांच्या माध्यमातून सिस्टिमॅटिक विथड्रॉवल प्लॅन (एसडब्ल्यूपी) ही गुंतवणूक संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यात आली आहे.

# ५० कर्तृत्ववान नवदुर्गांचा होणार भव्य सन्मान

## 'दुर्गा उत्सव २०२६'मध्ये पुरस्कार सोहळ्यासह रंगणार पारंपरिक गरबा महोत्सव; ४०० हून अधिक नामांकनांतून ५० महिलांची निवड




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच राज्याच्या समृद्ध कला, संस्कृती आणि पारंपरिक वारशाचे जतन करण्याच्या उद्देशाने आशुतोष डान्स स्टुडिओज यांच्या वतीने 'दुर्गा उत्सव २०२६ | पर्व ३रे - राज्यस्तरीय नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार' या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुरस्कार सोहळ्यासोबतच पारंपरिक गरबा नृत्य शिबिर आणि स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने पुण्यात नारीशक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून नऱ्हे, सिंहगड रोड येथील शताक्षी बँक्वेट हॉल येथे हा सोहळा रंगणार आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कर्तृत्ववान महिलांच्या सन्मानासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाकडे सामाजिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

या भव्य उपक्रमाचे आयोजन युवा अभिनेता, नृत्य दिग्दर्शक व दिग्दर्शक श्री. आशुतोष अभिजीत संकाये पाटील यांनी केले असून, उद्योजक व निर्माते श्री. अभिजीत संकाये पाटील हे सहआयोजक आहेत.

महाराष्ट्र पोलीस दलाचे सेवानिवृत्त उपआयुक्त श्री. शहाजीराव पाटील यांचे या संपूर्ण उपक्रमाला मार्गदर्शन लाभत आहे. जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने हा सोहळा आयोजित करण्यात आला असून, पुण्यातील दैनिक आरंभपर्वकडे मिडीया पार्टनरची धुरा असणारआहे.

'राज्यस्तरीय नवदुर्गा महाराष्ट्र गौरव पुरस्कार - २०२६'साठी संपूर्ण महाराष्ट्रातून ४०० हून अधिक नामांकने प्राप्त झाली होती. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या महिलांमधून अंतिम ५० कर्तृत्ववान

दैनिक आरंभपर्व — मिडीया पार्टनर

नवदुर्गांची निवड करण्यात आली आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत या सर्व महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

'महाराष्ट्राच्या लेकींचा... नारीशक्तीचा गौरव' या मध्यवर्ती संकल्पनेतून आयोजित या पुरस्कार सोहळ्यात कला, संस्कृती, शिक्षण, सामाजिक कार्य, उद्योजकता, नृत्य, संगीत, सौंदर्य क्षेत्र, क्रीडा, पत्रकारिता, साहित्य, पारंपरिक कला, मेकअप, मॉडेलिंग तसेच विविध व्यावसायिक क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सिनेअभिनेत्री मा. जयमालाताई इनामदार यांच्या हस्ते होणार असून, भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा मा. सौ. तृप्तीताई देसाई कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. पुणे बिझनेस क्लबच्या संस्थापक व अध्यक्षा मा. सौ. सपना काकडे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच पी.के. ट्रेडर्स उद्योग समूह, महाराष्ट्र राज्याचे सर्वेसर्वा मा. श्री. शिवा इंडे आणि जनशक्ती विकास संघाचे अध्यक्ष मा. सोफी आसिफ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक मा. श्री. अनिकेत चव्हाण हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या पुरस्कारासाठी निवड झालेल्या कर्तृत्ववान महिलांमध्ये सौ. छाया राजाराम लोहकरे, सौ. दिपाली भाऊसाहेब जगताप, सौ. माधवी आनंद कुलकर्णी, सौ. सायली श्रीरंग वैद्य, सौ. प्रीती सुनील खिल्लारी, सौ. ह. भ. प. सायली महाराज बांदल, सौ. इंदिरा रमेश अहिरे, सौ. इंदिरा गणेश जगदाळे, सौ. माधवी माधवराव धर्माधिकारी, सौ. माधुरी गणेश गाडेकर, श्रीमती मनीषा रविंद्र हसबनीस, सौ. दीपा संजय लोमटे, सौ. राधा राहूल लवेकर, ॲड. सोनम पोते-पिसाळ, सौ. ऐश्वर्या प्रितम जाधव, कु. सोनाली मनोज आहेर, सौ. गौरी प्रसाद वनारसे, पूजा हेमंत गायकवाड, सौ. प्रज्ञा दर्शन सोनार, सौ. प्राजक्ता हर्षद शिवणकर, सौ. सुनैना तुषार कदम, सौ. स्वप्नाली मयूर कुंभार, सौ. स्वाती ज्ञानेश रायरीकर, कु. तेजश्री गणपती सांगलीकर, सौ. योगिता शैलेश कांबळे, सौ. ज्योत्स्ना संजय मोहिते, कु. कीर्ती अजित खलाटे, कु. धनश्री दत्तात्रय गायकवाड, कु. प्रतिक्षा सुजाता सुनील मांढरे, सौ. प्रिया मयूर आंबेकर, सौ. प्रियांका धनाजी परीट, कु. प्राजक्ता गोरख राऊत, सौ. रुबिना रुपेश चव्हाण, सौ. साक्षी संदेश बनकर, कु. साक्षी एकनाथ वाघ, सौ. सपना भावे, सौ. शिल्पा अजित नवाळे, सौ. शिवानी कुणाल वाघुले (म्हेत्रे), सौ. संगीता भालचंद्र कदम, कु. डॉ. श्रेया मनीषा प्रभाकर माशाळ, कु. सिद्धी विजय चवरे, सौ. सुजाता लक्ष्मण गावडे, कु. मनिषा अशोक कामठे, सौ. गंधाली अरगडे, कु. आदिती सुरेश कामठे, सौ. आदिती गणेश वाघमोडे, कु. गुंजन आशिष खवळे, हिंदवी सतीश चव्हाण, कु. जान्हवी दत्तात्रय बरकडे आणि कु. सायली लक्ष्मण गायकवाड यांचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या भूमीत आपल्या जिद्दीने, अथक परिश्रमाने, प्रतिभेने आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीने आदर्श निर्माण करणाऱ्या महिलांना 'नवदुर्गा' म्हणून गौरविण्यात येणार आहे.

आपल्या कार्यातून समाजाला दिशा देणाऱ्या आणि आपल्या कर्तृत्वातून इतरांना प्रेरणा देणाऱ्या या नारीशक्तीचा सन्मान म्हणजेच महाराष्ट्राच्या लेकींच्या सामर्थ्याला दिलेली मानवंदना आहे, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

### नारीशक्तीबरोबर संस्कृतीचाही जागर

'दुर्गा उत्सव' हा केवळ पुरस्कार सोहळा न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा उत्सव ठरावा, या उद्देशाने भव्य पारंपरिक गरबा नृत्य शिबीर आणि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव, युवकांचा उत्साह आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन असा त्रिवेणी संगम या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे.

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'वसुंधरा पायी दिंडी'चे प्रस्थान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगद्गुरू श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने पर्यावरण संवर्धनाचा महामंत्र आणि अध्यात्माचा पवित्र संदेश घेऊन 'वसुंधरा पायी दिंडी'ने श्रीक्षेत्र नाणीजधामच्या दिशेने प्रस्थान ठेवले. अतिशय भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात सिद्ध पादुकांच्या पावन सान्निध्यात हजारो धामयात्री पर्यावरण जागृतीच्या या मोहिमेत सहभागी झाले. मुख्य पीठ नाणीजधाम पश्चिम महाराष्ट्र पुणेच्या वतीने या पायी दिंडीचे आयोजन केले आहे. पीठाचे प्रमुख संजय गाडेकर, वसुंधरा पायी दिंडी प्रशासनाचे अध्यक्ष व प्रवक्ता प्रवीण ठाकूर, सहपीठप्रमुख कमलाकर हजारे यांनी विधिवत पादुकांचे पूजन केल्यानंतर ही पालखी व दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी दिंडीप्रमुख विजय आंग्रे व व्यवस्थापक विनायक नाईक उपस्थित होते.

प्रवीण ठाकूर म्हणाले, "महाराष्ट्रातील नागपूर, नाशिक, पुणे, परभणी, मुंबई येथून पाच, तर तेलंगणा व गोव्यातून दोन अशा एकूण सात ठिकाणहून या दिंडी निघाल्या आहेत. पुण्यातून निघालेल्या या दिंडीमध्ये जवळपास ६५० भक्तगण सहभागी झाले आहेत. पुणे ते नाणीजधाम असा ३५० किलोमीटरचा प्रवास ते १६ दिवसांत करणार आहेत. यादरम्यान दिवसभरात चार ठिकाणी वृक्षारोपण केले जाणार आहे. या सर्व दिंड्या २१ ऑक्टोबर रोजी नाणीजधाम येथे एकत्र येणार आहेत. २१ ऑक्टोबर रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांचा जन्मोत्सव असून, या नाणीजधाम येथील आश्रमात भजन, किर्तन, महाप्रसाद अशा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे."

संजय गाडेकर म्हणाले, 'वसुंधरा पायी दिंडी'चे हे चौथे वर्ष आहे. ही दिंडी सामान्य दिंडीप्रमाणे नाही. या दिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येतो. जागतिक तापमानवाढ रोखण्यासह झाडे लावण्याचा संदेश देणारे पोशाख, हातात फलक घेऊन सिद्ध पादुकांच्या सान्निध्यात ही वसुंधरा दिंडी निघाली आहे. गेल्या काही वर्षात तापमान वाढ, अवेळी पाऊस, अतिवृष्टी, नदी-नाल्यांची स्वच्छता यांसारख्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. त्याबाबत जनजागृती करणे हा या दिंडीचा मुख्य उद्देश आहे. वारीत सहभागी भक्तगण दररोज साधारण २५ किलोमीटरचा टप्पा चालतील."

वारकऱ्यांची जेवणाची-पाण्याची, राहण्याची, वैद्यकीय व्यवस्था चोख करण्यात आली आहे. आज कर्वेनगरमध्ये वारीचा पहिला मुक्काम असेल. ही दिंडी राजाराम पूल, सिंहगड रस्ता, स्वारगेट, हडपसरमार्गे सासवड येथून पुढे मार्गस्थ होईल, असे कमलाकर हजारे यांनी सांगितले. जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने रत्नागिरी येथे इंग्रजी माध्यमाची शाळा, वेदपाठशाळा पूर्णपणे मोफत चालवली जाते. तसेच रक्तदान शिबिरे, रुग्णवाहिका सुविधा यांसारख्या आरोग्याच्या विविध सुविधा दिल्या जातात. याशिवायही राज्यभरात समाजपयोगी विविध उपक्रम वर्षभर राबवले जातात, असेही त्यांनी नमूद केले.

## सोनावळे आश्रमशाळेत सर्पदंश जनजागृती अभियान



**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

सोनावळे ता.जुन्नर येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर व सर्पदंश जनजागृती अभियान उपक्रम घेण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. लायन्स क्लब ऑफ शिवनेरी व विघ्नहर नर्सिंग होम नारायणगाव यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर व सर्पदंश जनजागृती अभियान हा उपक्रम घेण्यात आला. यावेळी राष्ट्रीय सर्पदंश तांत्रिक सल्लागार समिती सदस्य व जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य शिवनेरी भूषण डॉ. सदानंद राऊत यांनी मुलांना सर्पदंशविषयी माहिती दिली. आपल्या भागात आढळणाऱ्या विषारी व बिनविषारी सापांच्या विविध जाती कोणत्या आहेत? विषारी व बिनविषारी साप कसा ओळखावा? सर्पदंश होऊ नये म्हणून कोणती काळजी घेतली पाहिजे व सर्पदंश झाल्यानंतर योग्य उपचार कसा केला जातो किंवा सर्पदंश झालेल्या व्यक्तीची किंवा रुग्णाची काळजी कशी घेतली जावी याबाबत स्वतःचे अनुभव सांगून माहिती दिली यावेळी व्हेनॉम वॉरियर्स हा माहितीपट दाखविण्यात आला.

शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती गुंड यांनी उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सन्मान केला तसेच लायन्स क्लबचे वतीने देखील शाळेतील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

# ईव्हीएमवर प्रथम आक्षेप घेणारे नेते भाजपचेच!

- अडवाणींच्या प्रश्नांपासून आजच्या चर्चेपर्यंत
- निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासाचा मुद्दा महत्त्वाचा

**(दै. आरंभ पर्व)**

भारतीय लोकशाहीची खरी ताकद मतदानाच्या प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासात आहे. मतदानाचे साधन कोणतेही असो मतपत्रिका असो किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदाराला आपले मत योग्य पद्धतीने नोंदले गेले आणि त्याची मोजणीही तितक्याच पारदर्शकपणे झाली, याची खात्री असणे आवश्यक आहे. त्यामुळे ईव्हीएमचा प्रश्न हा केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा विषय न राहता निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासाचा विषय म्हणून पाहिला पाहिजे.

विशेष म्हणजे, आज ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या राजकीय पक्षांकडे बोट दाखवण्यापूर्वी इतिहासाकडे पाहणे गरजेचे आहे. ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत ठोस सार्वजनिक प्रश्न उपस्थित करणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. २००९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर अडवाणी यांनी ईव्हीएम पूर्णपणे दोषरहित असल्याची खात्री निवडणूक आयोगाने द्यावी, अन्यथा मतपत्रिकेचा पर्याय पुन्हा विचारात घ्यावा, अशी भूमिका मांडली होती. त्या वेळी ही भूमिका मुख्य प्रवाहातील राजकीय पक्षाच्या नेत्याकडून ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर उपस्थित केलेला महत्त्वाचा प्रश्न ठरली.

याचा अर्थ असा नाही की ईव्हीएमबाबत शंका अडवाणींपूर्वी कुणी व्यक्त केल्या नव्हत्या. इतर राजकीय नेते, तज्ज्ञ आणि संघटनांकडूनही या यंत्रांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा होत होती. त्यामुळे 'भारतामधील सर्वप्रथम ईव्हीएमविरोधी नेता' असा निर्विवाद दावा करण्यापेक्षा 'ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर ठोस राजकीय आक्षेप सार्वजनिकपणे मांडणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये अडवाणी अग्रस्थानी होते', असे म्हणणे अधिक अचूक ठरेल.

अडवाणींच्या भूमिकेनंतर ईव्हीएमच्या सुरक्षिततेवर देशभरात मोठी चर्चा झाली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल झाली आणि ईव्हीएममध्ये छेडछाड होऊ शकते का, त्यांच्या कार्यपद्धतीची तपासणी कशी केली जाते, यावर प्रश्न उपस्थित झाले. त्याच काळात निवडणूक आयोगाने मात्र ईव्हीएमच्या सुरक्षिततेबाबत आपला विश्वास कायम असल्याचे स्पष्ट केले होते.

आज परिस्थिती पुढे सरकली आहे. ईव्हीएमसोबत मतदार पडताळणी यंत्रणा अर्थात व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येतो. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, व्हीव्हीपॅटचा पहिला वापर २०१३ मध्ये झाला आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपासून सर्व मतदान केंद्रांवर त्याचा वापर करण्यात आला. मतदाराने मतदान केल्यानंतर छापील चिठ्ठीद्वारे आपले मत योग्य उमेदवाराला नोंदले गेले आहे की नाही, हे पाहता येते. मात्र तंत्रज्ञान बदलले म्हणून प्रश्न संपत नाहीत. उलट, तंत्रज्ञान जितके प्रगत होते तितकी पारदर्शकतेची गरज अधिक वाढते. ईव्हीएम सुरक्षित असल्याचे सांगणे आणि त्याच्या सुरक्षिततेची प्रक्रिया राजकीय पक्ष, उमेदवार आणि सामान्य मतदारांना समजेल अशा पद्धतीने स्पष्ट करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. लोकशाहीत पराभूत झालेल्या पक्षाने ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केला तर त्याकडे संशयाने पाहिले जाते; पण सत्ताधारी पक्ष किंवा विजयी पक्षाने ईव्हीएमवर पूर्वी काय भूमिका घेतली होती, हेही जनतेने लक्षात ठेवले पाहिजे. कारण निवडणूक प्रक्रियेबाबतचा विश्वास हा सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंसाठी समान असला पाहिजे.

अडवाणींच्या जुन्या भूमिकेची आठवण आज म्हणूनच महत्त्वाची ठरते. ईव्हीएमवर प्रश्न विचारणे हे एका पक्षाचे किंवा एका विचारधारेचे मक्तेदारीचे क्षेत्र नाही. ज्या दिवशी कोणताही पक्ष सत्तेत असतो, त्या दिवशी त्याला निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास टिकवण्याची जबाबदारी असते; आणि विरोधात असताना त्याच प्रक्रियेतील त्रुटींवर प्रश्न विचारण्याचा अधिकारही असतो.

शेवटी प्रश्न ईव्हीएम विरुद्ध मतपत्रिका असा नसून 'मतदाराच्या मताचा विश्वास कसा अबाधित ठेवायचा?' हा आहे.

मतदान यंत्रणा कोणतीही असो, निकालाबाबत संशय निर्माण होणार नाही, प्रत्येक मतदाराला प्रक्रिया पारदर्शक वाटेल आणि प्रत्येक पक्षाला निवडणूक प्रक्रियेवर विश्वास ठेवता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

**कारण निवडणूक जिंकणे किंवा हरणे हा राजकारणाचा भाग आहे; पण मतदाराचा विश्वास गमावणे ही लोकशाहीची मोठी हानी आहे.**


## ग्रामपंचायत कनेरसर, ता. खेड, जि. पुणे

### निविदा नोटीस

खालील कामांची सीलबंद निविदा ग्रामपंचायत कनेरसर, ता.खेड, जि.पुणे हे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार/मक्तेदार यांचेकडून (२ लिफाफा पध्दतीने) मागवीत आहे.

कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. कार्यालय कनेरसर येथे उपलब्ध असून सदर निविदा दि.०८/१०/२०२६ ते १४/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ०२ वाजेपर्यंत या वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतील. व ठेकेदार यांचेकडून पाठविण्यात आलेल्या सीलबंद निविदा सदर कालावधीत स्वीकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. १४/१०/२०२६ रोजी दुपारी ०३ : ०० वाजता ग्रा.पं. कार्यालय कनेरसर येथे उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोरी निविदा रक्कम | कामाचा कालावधी | मक्तेदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | मौजे कनेरसर येथील जिल्हा परिषद शाळा दरावस्ती येथे पाणीपुरवठा काम करणे. | ग्रामनिधी | १,०७,००८/- | १ टक्के | ५९०/- | ६ महिने | खुला |
| २ | मौजे कनेरसर येथील गावठाण सार्वजनिक विहीर मोटार बसविणे व पाईपलाईन करणे. | ग्रामनिधी | ३,९९,२१५/- | १ टक्के | ५९०/- | ६ महिने | खुला |
| ३ | मौजे कनेरसर येथील के.टी. वेअर ढापे बसविणे. | ग्रामनिधी | १,७५,५३७/-, | १ टक्के | ५९०/- | ६ महिने | खुला |

**नियम व अटी**

१) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखले सादर करणे आवश्यक आहे. २) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती बाबतचा तपशील निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधीन राहून निविदाधारक ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी. ३) सदर इसारा रक्कम ही ग्रामपंचायत कनेरसर या नावाने डी. डी/चेक स्वरुपात जमा करणे आवश्यक राहील. ४) विहित मुदतीनंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्वीकारली जाणार नाहीत. ५) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष सदर निविदा मागणी कालावधीत दि. १४/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेपूर्वी दुपारी २.०० वाजेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ६) प्राप्त निविदा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील. ७) प्राप्त निविदांपैकी निविदा स्वीकारणे व फेटाळणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे. ८) सदर कामाची सुरक्षा अनामत रक्कम भरल्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही. ९) वरील अटी व शर्तीस अधीन राहून दरपत्रके सादर करावीत.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कनेरसर, ता.खेड, जि. पुणे.**

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत कनेरसर, ता.खेड, जि. पुणे.**

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



## थोडक्यात पण महत्वाचे



## १९व्या यलो रिबन NGO फेअर प्रस्तुत 'कला कृषी बाजार'चा पुण्यात समारोप

पुणे (आरंभ पर्व) :इशान्या फाउंडेशनतर्फे NABARDच्या भारत ग्राम उत्सवाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 19व्या 'कला कृषी बाजार' या उपक्रमाचा पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. भारतभरातील कारागीर, शेतकरी, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक उद्योजकांना एकत्र आणणाऱ्या या पाच दिवसीय उपक्रमात 20 हून अधिक राज्यांतील 150 हून अधिक सहभागी संस्था आणि 3,000 हून अधिक उत्पादने सहभागी झाली. पारंपरिक हस्तकला, हातमाग, कृषी उत्पादने, शाश्वत उत्पादने आणि विविध प्रादेशिक खाद्यपदार्थ अनुभवण्याची तसेच त्यामागील समुदायांशी थेट संवाद साधण्याची संधी यामुळे पुणेकरांना मिळाली. समारोप सोहळ्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे 'अतुल्य योगदान पुरस्कार 2026'प्रदान करण्यात आले. कृषी, ग्रामीण विकास आणि समुदाय सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात आला.



## बक्षीस देत केले विद्यार्थ्यांचे कौतुक

पुणे (आरंभ पर्व) : कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय, मनपा शाळा क्रमांक २०४ (बी) येथील इयत्ता चौथीच्या वर्गाची पालक सभा उत्साहात पार पडली. शिष्यवृत्ती परीक्षेच्या पार्श्वभूमीवर आयोजित या सभेत पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. वर्गशिक्षिका सौ. श्रद्धा नाडकर्णी यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन तसेच विद्यार्थ्यांचा घरी कोणत्या पद्धतीने अभ्यास करून घ्यावा, याबाबत मार्गदर्शन केले. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांना आजारपणामुळे शाळा बुडू नये यासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी याबाबतही त्यांनी सविस्तर माहिती दिली. जून महिन्यापासून वर्गात राबविण्यात येत असलेल्या कृतियुक्त शिक्षण, विविध शैक्षणिक साहित्य, कागदी पिशव्या निर्मिती, 'आम्ही इंग्रजी शिकतो', बचत बँक, संवाद कौशल्य, रांगोळी रेखाटन, पर्यावरणपूरक उपक्रम, ग्रंथालय, स्वच्छ व सुंदर वर्ग, वाचनालय आणि वाचन सप्ताह आदी उपक्रमांची माहितीही पालकांना देण्यात आली. या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेला सकारात्मक बदल पाहून पालकांनी विद्यार्थ्यांसह वर्गशिक्षिका सौ. श्रद्धा नाडकर्णी यांचे कौतुक केले. 'स्वच्छ व सुंदर वर्ग' उपक्रमांतर्गत सप्टेंबर महिन्यात वर्ग स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकांच्या हस्ते बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. या पालक सभेच्या आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर, पर्यवेक्षिका सौ. डोळस तसेच सहाय्यक प्रशासकीय अधिकारी श्री. उचाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## लोणावळ्यात वेट'एन जॉयमध्ये 'ग्लो गार्डन सुरु




पुणे (आरंभ पर्व) : लोणावळ्यातील पर्यटनाला आता रात्रीच्या मनोरंजनाची नवी जोड मिळणार आहे. वेट'एन जॉयने आपल्या परिसरात 'ग्लो गार्डन' सुरू केले असून, एकाच ठिकाणी वॉटर पार्क, अम्युझमेंट पार्क आणि संध्याकाळचा अलौकिक अनुभव अशी तीन वेगवेगळी आकर्षणे पर्यटकांना अनुभवता येणार आहेत. महाराष्ट्रातील या स्तरावर आणि अशा प्रकारचा हा पहिलेच ग्लो गार्डन असणार आहे. दिवसभर वॉटर पार्क आणि अम्युझमेंट पार्कमधील राइड्सचा आनंद घेतल्यानंतर सूर्यास्तानंतर परिसराचे स्वरूप बदलणार आहे. विविध रंगांच्या प्रकाशयोजना आणि मोठ्या आकाराच्या प्रकाशमान कलाकृतींनी सजवलेल्या ग्लो गार्डनमध्ये निसर्ग, प्राणी आणि कल्पनाविश्वावर आधारित रचना साकारण्यात आल्या आहेत. प्रकाशमान मोर, फुलपाखरे, फुलांच्या रचना तसेच विविध रंगीबेरंगी प्राण्याचा संसार हे या परिसरातील प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

## बदाम भेट देण्याची परंपरा नव्याने मांडणारी ब्रँडची नवीन मोहीम



पुणे (आरंभ पर्व) : या दिवाळीत, कॅलिफोर्निया बदाम आपली नवीन सणासुदीची मोहीम 'प्रत्येक बडीसाठी बदाम' लॉंच करत असून, ग्राहकांना त्यांच्या दिवाळीच्या भेटवस्तूंच्या यादीचा नव्याने विचार करण्याचे एक कारण देत आहे. एका उत्साही म्युझिकल फिल्मद्वारे सादर करण्यात आलेली ही मोहीम तरुण ग्राहकांना त्यांच्या नेहमीच्या कौटुंबिक यादीच्या पलीकडे पाहण्याचे आणि त्यांच्या आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अनेक मित्रांनाही बदाम भेट देण्याचे आवाहन करते—वर्क बडींपासून जिम बडींपर्यंत, ट्रॅव्हल बडींपासून कॉफी बडींपर्यंत आणि त्याही पुढे. दिवाळी हा भारतातील भेटवस्तू देण्याच्या सर्वात मोठ्या प्रसंगांपैकी एक आहे. त्याच वेळी, लोक भेटवस्तू कशा देतात आणि कोणाला देतात, यामध्येही बदल होत आहे. नव्या पिढीसाठी, पहिली नोकरी सुरू करणे, नवीन शहरांमध्ये राहणे आणि आपले असे मित्रांचे वर्तुळ तयार करणे, जे आता निवडलेले कुटुंब बनले आहेत, यामुळे सणासुदीच्या भेटवस्तूंची यादी आता नातेवाईक आणि औपचारिक संबंधांच्या पलीकडेही विस्तारली आहे. 'प्रत्येक बडीसाठी बदाम' ही मोहीम बदाम भेट देण्याच्या परंपरेला आणखी एक पाऊल पुढे घेऊन जाते.

# वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना करा

### जांभुळवाडी बोगदा–नवले चौक मार्ग : अवजड वाहनांवर नियंत्रणासाठी तात्पुरता चेकपोस्ट सुरू करण्याची नगरसेवक हरिदास चरवड यांची मागणी

- आमदार तापकीर व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना निवेदन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जांभुळवाडी बोगदा ते नवले चौक या मार्गावर वाढत असलेली वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका लक्षात घेता अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तातडीने नियंत्रण आणावे, अशी मागणी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक हरिदास चरवड यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर तसेच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना देण्यात आले आहे. जांभुळवाडी बोगदा परिसरातून सध्या मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत आहे. त्यातच वाहनांची वाढती संख्या, अरुंद मार्ग आणि गर्दीच्या वेळेतील वाहतूक यामुळे या परिसरात वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढून नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे चरवड यांनी निवेदनात नमूद केले आहे. वाहतूक कोंडी आणि अपघातांवर तातडीने नियंत्रण मिळविण्यासाठी जांभुळवाडी बोगदा परिसरात तात्पुरता चेकपोस्ट सुरू करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. आवश्यक असलेल्या अवजड वाहनांची तपासणी करून त्यांना नियंत्रित वेळेत पुढे सोडावे, जेणेकरून गर्दीच्या वेळेत होणारी वाहतूक कोंडी कमी होईल, अशी सूचना करण्यात आली आहे.

याशिवाय आवश्यक त्या ठिकाणी स्पीड लिमिट, साईनेज, ब्लिंकर, रिफ्लेक्टर आदी उपाययोजना कराव्यात. गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची नियमित नियुक्ती करून वाहतुकीचे प्रभावी नियमन करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. एनएचएआय, वाहतूक पोलीस आणि पुणे महानगरपालिका यांच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून या मार्गावरील वाहतूक नियंत्रणाची कायमस्वरूपी व्यवस्था निश्चित करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

### नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे

जांभुळवाडी बोगदा–नवले चौक परिसरातील वाहतुकीचा प्रश्न हा थेट नागरिकांच्या जीविताशी संबंधित असल्याने त्यावर केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उपाययोजना पूर्ण होईपर्यंत तात्पुरती वाहतूक नियंत्रण व्यवस्था सुरू ठेवावी आणि परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन आवश्यक ते बदल करावेत, अशी मागणी हरिदास चरवड यांनी केली आहे. आमदार भीमराव तापकीर आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित यंत्रणांना तातडीने कार्यवाहीच्या सूचना द्याव्यात, अशी अपेक्षाही चरवड यांनी व्यक्त केली आहे.

## कोटक सिक्युरिटीजने आपल्या रिटेल व्यवसायाचे नाव बदलून केले 'कोटक निओ'

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

कोटक सिक्युरिटीज लिमिटेडने आज आपल्या ग्राहकांसाठीच्या ब्रँड ओळखीचे नाव बदलून 'कोटक निओ' करत असल्याचे जाहीर केले. याद्वारे एक एकीकृत आणि भविष्यासाठी सज्ज असलेली गुंतवणूक व्यवस्था तयार करण्यात आली आहे. आजच्या काळात ग्राहक ज्या प्रकारे आर्थिक बाजारात सहभागी होतात, त्या पद्धतीत झालेला मूलभूत बदल 'कोटक निओ'मधून दिसून येतो. आजच्या ग्राहकांना अधिक पर्याय, विनाअडथळा डिजिटल अनुभव आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एकाच ठिकाणी हवे आहे.

भारतातील गुंतवणूकदार आणि ट्रेडर्सच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोटक सिक्युरिटीजने नवीन तंत्रज्ञान, उत्पादन नवकल्पना, संशोधन आणि ग्राहक अनुभवामध्ये केलेल्या मोठ्या गुंतवणुकीनंतर हा बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे डिजिटल क्षमता, संशोधन क्षेत्रातील प्राविण्य आणि रिलेशनशिप-आधारित सुविधा एकत्र येऊन हा संपूर्ण व्यवसाय एकाच ब्रँड ओळखीखाली आला आहे. या लॉंच प्रसंगी बोलताना कोटक निओचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाल शाह म्हणाले, "गुंतवणूकदारांच्या गरजा सतत बदलत आहेत. आज ते फक्त शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा डेरिव्हेटिव्ह्ज यांसारख्या वैयक्तिक उत्पादनांचा विचार करत नाहीत, तर संपत्ती कशी निर्माण करायची, पोर्टफोलिओमध्ये विविधता कशी आणायची आणि अर्थव्यवस्थेतील विविध संधींमध्ये कसे सहभागी व्हायचे, या संपूर्ण चित्राचा विचार करत आहेत. परंतु या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म्स, पुरवठादार आणि सल्लागारांशी संपर्क साधावा लागतो.

## नऱ्हेत फुलपाखरू उद्यानाचे लोकार्पण

- 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनचा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम
- सुमारे ४० पर्यावरणप्रेमी व सहकार्य करणाऱ्या संस्थांचा सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे येथील स्वर्गीय उत्तमराव पाटील जैवविविधता वन उद्यानात 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या फुलपाखरू उद्यानाचे उद्घाटन रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पर्यावरण क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले. या उपक्रमातून जैवविविधता संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि निसर्गप्रेमाचा संदेश देण्यात आला. फुलपाखरू उद्यानाचे उद्घाटन देवराई फाऊंडेशनचे जनक वनश्री श्री. रघुनाथ ढोले, वनस्पती अभ्यासक श्री. मिलिंद गिरधारी, प्रादेशिक वनीकरण विभागाचे श्री. प्रमोद रासकर, वनस्पती अभ्यासक व उद्योजक श्री. धनंजय शेडबाळे आणि Mikro Innotech चे श्री. राजेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनच्या सदस्यांनी प्रेमाने वाढविलेल्या वडाच्या झाडाचे वृक्षपूजन करण्यात आले. स्थायी समिती सदस्या जयश्री भूमकर, पुणे मनपा वृक्ष समिती सदस्या, कोमलताई नवले तसेच फाऊंडेशनच्या महिला सदस्यांच्या हस्ते वृक्षपूजन करण्यात आले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी झाडांबाबत लिहिलेल्या आज्ञापत्राचे अनावरण श्री. राजेश पवार आणि शिवसृष्टीचे व्यवस्थापक श्री. अनिल पवार यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाच्या कार्याला ऐतिहासिक संदर्भाची जोड देणारा हा उपक्रम उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनच्या गेल्या ७ ते ८ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत मोलाचे सहकार्य करणाऱ्या संस्था, कंपन्या, सामाजिक संस्था आणि पर्यावरणप्रेमींचा यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये झील महाविद्यालय, पीआयसीटी कॉलेज तसेच सीएसआरच्या माध्यमातून सहकार्य करणाऱ्या एसएफएस ग्रुप इंडिया प्रा. लि., कमिन्स इंडिया लि., विनटेक, क्युबिक्स, माइक्रो इनोटेक, बेसिल ग्रुप, टाटा पॅसेंजर व्हेईकल आदी संस्थांचा समावेश होता. तसेच टेकडीवरील सुप्रभात योगा, वाघजाई ट्रेकर्स, सिंहगड ट्रेकर्स ग्रुप, जय मल्हार ट्रेकर्स ग्रुप आणि 'सकाळ'चे डॉ. सोमनाथ गीते यांच्यासह पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात योगदान देणाऱ्या जवळपास ४० व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला.

टेकडी आणि परिसराच्या संवर्धनासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे यावे तसेच 'झाडे लावा, झाडे जगवा' फाऊंडेशनच्या वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले. फुलपाखरू उद्यानाच्या माध्यमातून नऱ्हे परिसरातील जैवविविधतेला चालना मिळण्यासोबतच नागरिक, विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमींमध्ये निसर्गाविषयीची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

## नऱ्हेच्या खेळाडूंची गोव्यात राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग स्पर्धेत दमदार कामगिरी



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

गोवा येथे झालेल्या तिसऱ्या राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग स्पर्धेत नऱ्हे येथील फायटर मार्शल आर्ट अँड लेडीज स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कर्नाटक संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशनच्या वतीने गोवा येथील पेडणे बॉक्सिंग हॉलमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध राज्यांतील खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. नऱ्हेच्या खेळाडूंनी आक्रमक आणि तंत्रशुद्ध खेळाचे प्रदर्शन करत पदकांची कमाई केली. स्वरा गोमाने, आदित्य पवार, कार्तिक मरगळे आणि इशिता चंद्रात्रे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तर रुद्र वर्मा, राजवीर बांदल आणि आरव रांजणे यांनी रौप्यपदक मिळविले.

या खेळाडूंना प्रशिक्षक किरण माने यांचे मार्गदर्शन लाभले. नियमित सराव आणि योग्य प्रशिक्षणाच्या जोरावर खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध केली. स्पर्धेचे प्रमुख पाहुणे इंडिया थाई बॉक्सिंग फेडरेशनचे संस्थापक-अध्यक्ष संतोष मात्रे, 'अवकारिका' चित्रपटाचे दिग्दर्शक अरविंद भोसले आणि अभिनेता रोहित पवार यांच्या उपस्थितीत विजेत्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. नऱ्हे येथील खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाबद्दल या आधारस्तंभ वीरांश युथ फाऊंडेशनच्या अध्यक्ष सौ .कोमल सतीश कुटे आणि तुषार कोल्हे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे नऱ्हेच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकण्यापूर्वीच १२.५० लाख वाचविले!

### येरवडा सायबर पथकाची तत्पर कारवाई; बनावट पोलीस अधिकाऱ्यांकडून नागरिकाला धमकावून बँक खात्यांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'तुमचे एटीएम कार्ड एका आरोपीकडे सापडले असून तुमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अटक टाळायची असेल तर तुमच्या बँक खात्यांची, मुदत ठेवींची आणि इतर आर्थिक व्यवहारांची माहिती द्या,' अशी धमकी देत एका ५४ वर्षीय नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट' करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, फसवणुकीचा प्रकार लक्षात येताच नागरिकाने तत्काळ येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाशी संपर्क साधला. सायबर पथकाने क्षणाचाही विलंब न करता संबंधित बँकांशी संपर्क साधून खाती गोठविल्याने १२ लाख ५० हजार रुपयांची रक्कम सुरक्षित करण्यात पोलिसांना यश आले.

याप्रकरणी प्रमोद माधव पोरे (वय ५४, रा. त्रिदल नगर, येरवडा, पुणे) यांना दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास अनोळखी क्रमांकावरून दूरध्वनी आला. समोरील व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवून पोरे यांना घाबरविण्यास सुरुवात केली.

'तुमचे एटीएम कार्ड नरेश गोयल नावाच्या आरोपीकडे सापडले आहे. तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक टाळायची असेल तर तुमच्या बँक खात्यांची, मुदत ठेवींची आणि आर्थिक व्यवहारांची माहिती द्या,' असे सांगून संबंधिताने पोरे यांच्यावर दबाव आणला. त्यानंतर त्यांना 'डिजिटल अरेस्ट' करण्याची भीती दाखविण्यात आली.

घाबरलेल्या पोरे यांनी संबंधितांना त्यांच्या बँक खात्यांची माहिती दिली. मात्र, काही वेळाने आपली फसवणूक करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाशी संपर्क साधला.

सायबर पथकाने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तत्काळ हालचाली सुरू केल्या. संबंधित बँकांशी तातडीने संपर्क साधून पोरे यांची बँक खाती गोठविण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या खात्यातील १२.५० लाख रुपयांची रक्कम सायबर भामट्यांच्या हातात जाण्यापासून वाचली. या प्रकरणातून नागरिकांनी अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या अशा धमकीच्या दूरध्वनींपासून सावध राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. सीबीआय, ईडी, पोलीस, सीमाशुल्क विभाग अथवा अन्य कोणत्याही सरकारी यंत्रणेच्या नावाने दूरध्वनी करून 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली पैसे किंवा गोपनीय माहिती मागणे हा सायबर गुन्हेगारांचा फसवणुकीचा प्रकार आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-४ चिलुमुला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त येरवडा विभाग सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक शारदा कोकाटे (गुन्हे), पोलीस निरीक्षक केशव दिंडे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश राठोड, पोलीस हवालदार समीर पिलाने, पोलीस शिपाई मनोज भागवत, स्वप्निल पिंगळे, महिला पोलीस शिपाई रोहिणी भोकसे आणि महिला पोलीस शिपाई मिनाक्षी कापडे यांच्या सायबर तपास पथकाने ही कारवाई केली.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

सीबीआय, ईडी, पोलीस किंवा सीमाशुल्क विभागाच्या नावाने अशा प्रकारचा दूरध्वनी आल्यास घाबरून जाऊ नये. कोणतीही वैयक्तिक किंवा बँक खात्याची माहिती, संकेतशब्द अथवा एकदाच वापरला जाणारा संकेतांक (ओटीपी) कोणालाही देऊ नये. संशयास्पद दूरध्वनी आल्यास तातडीने १९३० या सायबर गुन्हे हेल्पलाइन क्रमांकावर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पत्रकार राजेंद्र सोनवलकर यांचा उपक्रम प्रेरणादायी : अमोल गवळी

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यामध्ये गेल्या वीस वर्षापासून दैनिक आरंभ पर्वचे दौंड तालुका प्रतिनिधी राजेंद्र सोनवलकर, तथा आदर्श व तंटामुक्त गाव ग्रामपंचायत गोपाळवाडीचे महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष हे पत्रकारी व सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रामध्ये काम करीत असून त्यांना विविध क्षेत्रांमध्ये अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत, जिल्हा परिषद शाळा चोरमले वस्ती गोपाळवाडी ता दौंड या ठिकाणी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील मुलांना वह्या, पेन, पेन्सिल, अंगणवाडीतील मुलांना खेळणी, तसेच सर्व मुलांना केळी दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अमोल गवळी, केंद्रप्रमुख सुशा खरात, यांच्या हस्ते करण्यात आले, याप्रसंगी दौंड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अमोल गवळी म्हणाले की, पत्रकार राजेंद्र सोनवलकर हे जे उपक्रम राबवत आले आहेत ते प्रेरणादायी असून अशाच प्रकारे समाजाने प्रेरणा घेणे गरजेचे आहे, यावेळी पत्रकार राजेंद्र सोनवलकर म्हणाले की, जि प शाळेतील मुलांना माझ्या परीने भविष्यात सुद्धा मदत करण्याची ग्वाही दिली,यावेळी जि प शाळेतील मुलांच्या आनंदाला पाराच उरला नव्हता, या कार्यक्रम प्रसंगी गोपाळवाडी गावचे सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब गिरमे, शांताराम होले, मयुरेश शिंदे, भावी चेअरमन योगेश चोरमले, प्राध्यापक दिनेश पवार, मुख्याध्यापका सुजाता कुदळे, अँड किशोर टेकवडे, अंगणवाडी सेविका रेखाताई डोंगरे, आप्पासाहेब पवार, गणेश चोरमले, बेबीताई गिरमे, आधी यावेळी उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप होले सर यांनी केले.

## इंडियन स्कूल ऑफ बिझनेसची २५ वर्षे पूर्ण; २५० शिष्यवृत्ती देण्याची करण्याची घोषणा

हैदराबाद/मोहाली (आरंभ पर्व) : फायनान्शियल टाइम्स ग्लोबल एमबीए रँकिंग्स 2026 मध्ये भारतात प्रथम आणि जगात 12व्या क्रमांकावर असलेल्या इंडियन स्कूल ऑफ बिझनेस (ISB)ने आपला 25 वा वर्धापनदिन साजरा केला. यानिमित्त ISB@25 या दीर्घकालीन उपक्रमांची घोषणा करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश मॅनेजमेंट शिक्षण अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच भारतातील संशोधन आणि शिक्षणाची क्षमता मजबूत करणे हा आहे. ISB25 स्कॉलर्स प्रोग्राम अंतर्गत ISB दरवर्षी 250 शिष्यवृत्ती देणार आहे. या शिष्यवृत्ती ISBच्या प्रमुख पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन मॅनेजमेंट (पीजीपी) आणि पीजीपी इन मॅनेजमेंट फॉर यंग लीडर्स (पीजीपी YL) या अभ्यासक्रमांसाठी दिल्या जातील. ही शिष्यवृत्ती गुणवत्ता आणि आर्थिक गरज यांच्या आधारावर दिली जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात 100%, 50%, 30% आणि 25% पर्यंत सवलत मिळणार आहे. देशातील विविध क्षेत्रांतील हुशार विद्यार्थ्यांना ISBमध्ये शिक्षणाची संधी मिळावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. वेगवेगळ्या आर्थिक, भौगोलिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमीतील हुशार विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे मॅनेजमेंट शिक्षण मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

## एचवायबीईकडून 'वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया'ची घोषणा




पुणे (आरंभ पर्व) : एचवायबीई आपला प्रमुख जागतिक संगीत महोत्सव वीवर्स कॉन फेस्टिव्हल प्रथमच भारतात घेऊन येत आहे. 27-28 मार्च 2027 रोजी नवी दिल्ली येथे हा महोत्सव आयोजित करण्यात येणार असून, कोरियाबाहेर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन भारतात होणार आहे. दोन दिवस चालणारा वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया एचवायबीई चा खास थेट संगीताचा अनुभव भारतात घेऊन येणार आहे. या महोत्सवात भारतातील तसेच जगभरातील नामांकित कलाकार, नेत्रदीपक संगीत सादरीकरणे आणि चाहत्यांच्या संस्कृतीचा उत्साहपूर्ण जल्लोष एकाच मंचावर पाहायला मिळणार आहे. भारतीय चाहत्यांसाठी हा महोत्सव एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार असून, भारतीय चाहत्यांसाठी, हा महोत्सव देशातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या के-पॉप महोत्सवांपैकी एक असेल. जागतिक सुपरफॅन प्लॅटफॉर्म वीवर्सच्या माध्यमातून विकसित झालेल्या इमर्सिव्ह फॅन अनुभवातून प्रेरणा घेत, हा महोत्सव केवळ लाईव्ह परफॉर्मन्सपुरता मर्यादित राहणार नाही. एका प्रत्यक्ष ठिकाणी संगीत, चाहत्यांचा परस्परसंवादी सहभाग, ब्रँड ॲक्टिव्हेशन्स आणि सांस्कृतिक अनुभव यांचा अनोखा संगम या महोत्सवात पाहायला मिळणार आहे. कलाकार आणि त्यांच्या चाहतावर्गातील नातेसंबंधावर आधारित या महोत्सवात चाहत्यांना संपूर्ण अनुभवादरम्यान कलाकार तसेच इतर चाहत्यांशी संवाद साधण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वीवर्स कॉन फेस्टिव्हल इंडिया मध्ये भारतीय तसेच के-पॉप कलाकारांचा वैविध्यपूर्ण सहभाग असणार आहे. यासोबतच कलाकार आणि विविध संस्कृतींना नव्या पद्धतीने एकत्र आणणारे विशेष सहयोगी मंच हे या महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहेत.

## विवोने एक्स फोल्ड६ केला लाँच

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : विवो इंडियाने आज आपला नवीनतम फोल्डेबल स्मार्टफोन, विवो एक्स फोल्ड६ लाँच केला, जो फ्लॅगशिप स्मार्टफोनच्या अनुभवाला मल्टीटास्किंगसाठी तयार केलेल्या एका शक्तिशाली उत्पादकता वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करतो. ओरिजिनओएस ७, प्रगत एआय टूल्स, फ्लॅगशिप झाईस इमेजिंग आणि ६९००mAh क्षमतेची मोठी बॅटरी यांसारख्या वैशिष्ट्यांसह, एक्स फोल्ड६ अशा व्यावसायिकांसाठी फ्लॅगशिप फोटोग्राफी आणि एक शक्तिशाली उत्पादकता अनुभव घेऊन येतो, ज्यांना प्रवासात असताना काम करायचे आहे, नवनिर्मिती करायची आहे आणि कनेक्टेड राहायचे आहे. एक्स फोल्ड६ चा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी ओरिजिन वर्कबेंच आहे, जे मोठ्या फोल्डेबल डिस्प्लेला एकाच वेळी अनेक ॲप्स व्यवस्थापित करण्यासाठी एका लवचिक वर्कस्पेसमध्ये रूपांतरित करते. एआय क्रॉस-ॲप ड्रॅगच्या मदतीने, वापरकर्ते ॲप्समध्ये सहजपणे माहिती हस्तांतरित करू शकतात, जसे की प्रतिमेमधून मजकूर काढून तो थेट भाषांतरासाठी दुसऱ्या ॲपमध्ये ड्रॅग करणे, ज्यामुळे दैनंदिन मल्टीटास्किंग अधिक जलद आणि सोपे होते. एआय-शक्तीवर चालणारी साधने मीटिंग, फाइल व्यवस्थापन आणि वाचन यांसारखी कामे देखील सोपी करतात.

### राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक द. मा. पिंगळे व आरोग्यसेविका रोहिणी पिंगळे यांचा

# सेवापूर्ती व कृतज्ञता सोहळा साजरा

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ३९ वर्षे ज्ञानदान करत विद्यार्थी घडविणारे राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श पदवीधर शिक्षक दगडू मारुती पिंगळे आणि आरोग्य क्षेत्रात रुग्णसेवेचे व्रत निष्ठापूर्वक जपणाऱ्या त्यांच्या पत्नी आरोग्यसेविका रोहिणी दगडू पिंगळे यांचा 'सेवापूर्ती व कृतज्ञता सोहळा' येथे आयोजीत करण्यात आला होता.



राजगुरुनगर येथे राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक द. मा. पिंगळे व आरोग्यसेविका रोहिणी पिंगळे यांचा सेवापूर्ती व कृतज्ञता सोहळ्यात सन्मान करताना माजी आमदार दिलीप मोहिते पाटील व इतर मान्यवर.

(छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर)

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा निर्मला पानसरे, जिल्हा परिषद सदस्य ॲड. विजयसिंह शिंदे पाटील, जिल्हा परिषद सदस्या दीप्ती भोगाडे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, माजी सभापती विलास कातोरे, रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, साताऱ्याचे माजी शिक्षणाधिकारी विठ्ठल गोरडे, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपशिक्षणाधिकारी सिद्धार्थ चव्हाण उपस्थित होते

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह व शाल-श्रीफळ देऊन पिंगळे दांपत्याचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आपल्या मनोगतात मोहिते यांनी, पिंगळे सरांच्या शिक्षण क्षेत्रातील अजोड योगदानाचा आणि रोहिणी ताईंच्या आरोग्य क्षेत्रातील समर्पित सेवेचा पुनरुच्चार केला. तसेच, रोहिणी ताई गंभीर आजाराशी झुंज देत असताना, पिंगळे सरांनी एक भक्कम पती म्हणून पाठीशी उभे राहून केलेली सुश्रुषा आणि कुटुंबाला सावरण्याचे कार्य हे आजच्या समाजासाठी 'कौटुंबिक निष्ठेचे ज्वलंत उदाहरण' असल्याचे उद्गार काढले.

यावेळी ॲड. विजयसिंह शिंदे पाटील, ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, संजय नाईकडे आदी मान्यवरांची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाला. ईशस्तवन व स्वागतगीत डॉ. रोहिणी गव्हाणे यांनी सादर केले.प्रास्ताविक स्मिता पवळे यांनी तर सूत्रसंचालन तुषार वाटेकर व बाळासाहेब पिंगळे यांनी केले. आभार सर्जेराव पिंगळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी अक्षय चव्हाण, राजन जांभळे, बाळासाहेब सांडभोर, शांताराम घुमटकर, कैलास दुधाळे, सुनिल वाळुंज, संपत गारगोटे, जी. र. शिंदे, अमोल डावरे, गणेश डावरे यांच्यासह शैक्षणिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## रिव्हरसॉफ्टचे पुण्यातील घरांसाठी हार्ड वॉटर सोल्यूशन्स

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात वाढत्या हार्ड वॉटरच्या (खाऱ्या पाण्याच्या) समस्येमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. खाऱ्या पाण्यारमुळे नळ आणि शॉवरवर पांढऱ्या थराचे डाग पडणे, घरातील उपकरणांमध्ये क्षारांचा थर जमा होणे, साबण आणि डिटर्जंटचा जास्त वापर होणे तसेच केस आणि त्वचेबाबतच्या समस्या निर्माण होऊ शकतात. हिंजवडी, वाकड, बाणेर, बालेवाडी, खराडी, हडपसर, वाघोली आणि पिंपरी-चिंचवड या भागांमध्ये उंच इमारती आणि गेटेड सोसायट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या सोसायट्यांमध्ये महापालिकेचे पाणी, बोअरवेल आणि टँकर अशा वेगवेगळ्या स्रोतांमधून पाणीपुरवठा होत असल्याने पाण्याची गुणवत्ता वेगवेगळी असू शकते. खारे पाणी आणि पाण्याचे वेगवेगळे स्रोत यामुळे घरांमध्ये सहज बसवता येणाऱ्या



हार्ड वॉटर सोल्यूशन्सची गरज वाढत आहे. यासाठी इमारतीच्या संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेत बदल करण्याची गरज नसते. हे सोल्यूशन थेट पाणी वापरण्याच्या ठिकाणी सहज बसवता येते. या समस्यांवर उपाय म्हणून रिव्हरसॉफ्टने विविध वॉटर-केअर सोल्यूशन्स उपलब्ध केले आहेत. यामध्ये SF-15 Pro शॉवर आणि टॅप फिल्टर, DIVA-01 शॉवर फिल्टर, DIVA PRO टॅप फिल्टर आणि Bliss-15C कार्ट्रिज यांचा समावेश आहे. यातील SF-15 Pro हे पुण्यातील प्रमुख उत्पादनांपैकी एक आहे.

### बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासाच्या अनुषंगाने

## विद्यार्थ्यांच्या विकासात पालकांचे योगदान महत्वाचे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विद्यार्थ्यांचा विकास म्हणजे केवळ परीक्षेत चांगले गुण मिळवणे नव्हे. विचार करण्याची क्षमता, स्वतःच्या भावना समजून घेणे, इतरांशी संवाद साधणे, सहकार्य करणे आणि जबाबदारीने वागणे या गुणांचा विकास होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ज्ञानसंपन्न, संवेदनशील आणि सामाजिक भान असलेली व्यक्ती घडविण्यात शाळेबरोबरच पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

कुटुंब ही मुलाची पहिली शाळा आणि पालक हे पहिले शिक्षक असतात. घरातील वातावरण, पालकांचे आचरण, संवादाची पद्धत आणि मुलांशी असलेले नाते यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर मोठा परिणाम होतो.

बौद्धिक विकास : मुलांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन देणे, त्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तरे देणे आणि "आपण मिळून शोधूया" अशी भूमिका घेणे आवश्यक आहे.



**सौ. श्रद्धा नाडकर्णी**

गोष्टी सांगणे, पुस्तके वाचणे आणि त्यावर चर्चा करणे यामुळे भाषिक क्षमता व विचारशक्ती वाढते. घरातील दैनंदिन व्यवहारातूनही शिक्षण देता येते. बाजारातील खरेदीतून हिशेब, स्वयंपाकातून मोजमाप तर रोपांच्या संगोपनातून निसर्गाचे निरीक्षण शिकवता येते.

अभ्यासात मदत करताना पालकांनी मुलांचा गृहपाठ स्वतः करून न देता त्यांना विचार करून उत्तर शोधण्यास प्रवृत्त करावे. केवळ गुणांऐवजी प्रयत्न, सातत्य आणि झालेली सुधारणा यांचे कौतुक केल्याने आत्मविश्वास वाढतो.

भावनिक विकास : मुलांच्या यशाबरोबरच अपयशातही त्यांना स्वीकारणे गरजेचे आहे. मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्यांच्या भावनांना योग्य महत्त्व देणे आणि राग, भीती किंवा दुःख व्यक्त करण्याचे सकारात्मक मार्ग शिकवणे आवश्यक आहे. अपयश आल्यास दोष देण्याऐवजी "पुढच्या वेळी काय बदल करता येईल?" असा विचार करण्यास प्रवृत्त करावे. पालकांनी स्वतः संयम, संवाद आणि जबाबदारीचे उदाहरण मुलांसमोर ठेवावे.

सामाजिक विकास : नम्रपणे बोलणे, दुसऱ्याचे म्हणणे ऐकणे, सहकार्य करणे, नियमांचे पालन करणे आणि विविधतेचा आदर करणे या सवयी घरातून रुजतात. स्वतःची पुस्तके आवरणे, वस्तू जागेवर ठेवणे, घरातील छोट्या कामांत मदत करणे यामुळे जबाबदारीची जाणीव वाढते. मित्रांशी मतभेद झाल्यास मुलांना दोन्ही बाजू समजून घेऊन शांतपणे तोडगा काढण्यास मार्गदर्शन करावे.

पालक-शिक्षक समन्वय : मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शिक्षक यांच्यात नियमित संवाद आवश्यक आहे. गुणांबरोबरच मुलाचा सहभाग, वर्तन, आवडी आणि अडचणी यांवरही चर्चा व्हावी. मोबाईल व इंटरनेटचा संतुलित आणि सुरक्षित वापर, वाचन, खेळ, झोप आणि कौटुंबिक संवाद यांच्यात योग्य समतोल राखणेही गरजेचे आहे.

थोडक्यात, प्रत्येक मूल वेगळे आहे. त्याची क्षमता आणि गरज समजून घेत प्रेम, योग्य स्वातंत्र्य, स्पष्ट मर्यादा आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन दिल्यास बौद्धिकदृष्ट्या सक्षम, भावनिकदृष्ट्या समतोल आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विद्यार्थी घडण्यास निश्चितच मदत होते.

## 'बातमीदार आपल्या भेटीला' उपक्रमातून विद्यार्थ्यांना पत्रकारितेची ओळख

### कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालयातील चौथीच्या विद्यार्थ्यांशी पत्रकारांच्या मनमोकळ्या गप्पा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पाठ्यपुस्तकातील बातमी केवळ वाचण्यापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पत्रकारांशी संवाद साधता यावा, या उद्देशाने कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय, मनपा शाळा क्रमांक २०४-ब येथे 'बातमीदार आपल्या भेटीला' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता तिसरीपासून बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये विविध बातम्यांचा समावेश करण्यात येतो. बातमी वाचून त्यावर आधारित प्रश्न सोडविणे तसेच विद्यार्थ्यांना स्वतः बातमी तयार करण्यास सांगितले जाते. याच पार्श्वभूमीवर चौथीच्या विद्यार्थ्यांना बातमी कशी तयार होते, बातमीची माहिती पत्रकारांपर्यंत कशी पोहोचते आणि पत्रकारितेचे प्रत्यक्ष स्वरूप काय असते, याची माहिती



मिळावी, यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी दै. सकाळच्या वरिष्ठ पत्रकार सौ. जागृती कुलकर्णी आणि दै. आरंभपर्व पुणेचे निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बातमी कशी तयार केली जाते, बातमीसाठी माहिती कशी संकलित केली जाते, घटनास्थळी पत्रकाराची भूमिका काय असते, बातमी लिहिताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली जाते, तसेच आपण पत्रकारितेच्या क्षेत्रात कसे आलो, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनीही पत्रकारांना विविध प्रश्न विचारत संवादामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्यक्ष पत्रकारांशी झालेल्या संवादामुळे विद्यार्थ्यांना बातमी लेखनाची प्रक्रिया समजण्यास मदत झाली.

पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहते. विविध क्षेत्रातील व्यक्तींशी संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. त्यामुळे 'बातमीदार आपल्या भेटीला' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी विशेष ठरला. या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांनी उपस्थित मान्यवर पत्रकारांचे स्वागत करून आभार मानले. विद्यार्थी प्रतिनिधी श्रेयस वाघमारे आणि हिरण्या काळे यांनी मान्यवरांना पुस्तक व कागदी पिशवी भेट देऊन स्वागत केले. तसेच वर्गात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना पत्रकारितेची प्रत्यक्ष ओळख करून देणाऱ्या या उपक्रमाचे वर्गशिक्षिका नाडकर्णी यांनी आयोजन केले

## एअरटेल सर्व पोस्टपेड प्लॅनवर मोफत इंटरनॅशनल रोमिंग देते

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक, भारती एअरटेल ("एअरटेल"), यांनी आज नवीन पोस्टपेड प्लॅन लॉन्चची घोषणा केली, ज्यामध्ये अधिक लाभ समाविष्ट आहेत. ८ ऑक्टोबर २०२६ पासून, ग्राहक या नवीन पोस्टपेड प्लॅनसह दरवर्षी एका आंतरराष्ट्रीय प्रवासात मोफत रोमिंगचा आनंद घेऊ शकतात, तसेच सर्व विद्यमान लाभही. हे पूरक इंटरनॅशनल रोमिंग पॅक ५जीबी डेटा, ६० मिनिटे कॉल, २५ आउटगोइंग एसएमएस आणि मोफत इनकमिंग एसएमएस देते, जे ५ दिवसांसाठी वैध आहे. ग्राहकांना त्यांच्या आवडत्या वेळी ५-दिवसीय पॅक सक्रिय करण्याची संपूर्ण लवचिकता आहे, ज्यामुळे परदेशात प्रवास करताना जोडलेले राहणे सोपे होते. एअरटेल पोस्टपेड फॅमिली प्लॅनवरील ग्राहकांसाठी, मोफत इंटरनॅशनल रोमिंग पर्याय प्लॅनचा भाग असलेल्या प्रत्येक कुटुंब सदस्यासाठी उपलब्ध आहे. मोफत इंटरनॅशनल रोमिंग ही एअरटेल पोस्टपेड प्लॅनमधील नवीनतम भर आहे, जी फास्ट लेन तंत्रज्ञानाद्वारे उत्कृष्ट अनुभव, अनलिमिटेड डेटा, स्पॅम आणि फसव्या लिंक्सविरुद्ध नेटवर्क-स्तरीय संरक्षण देते. ग्राहक एअरटेल पोस्टपेड ॲडव्हांटेज क्लबद्वारे विविध मनोरंजन सदस्यता आणि एक्सक्लुझिव्ह अनुभवांचा आनंद घेऊ शकतात, ज्यामध्ये कॉमेडी शो, चित्रपट प्रीमियर आणि कॉन्सर्टचा समावेश आहे.

## युनायटेड ब्रुअरीजच्या महाराष्ट्रातील मूल्यसाखळीमुळे ५,९०० कोटींची मूल्यवृद्धी

### ३६,९०० रोजगारांना आधार : स्वतंत्र सामाजिक-आर्थिक अभ्यासातील निष्कर्ष

- **स्थानिक पुरवठादारांकडून १,४०० कोटींची खरेदी, ४,२०० कोटींच्या कर महसुलाला योगदान**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

हेनेकेन समूहाचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेडच्या (यूबीएल) महाराष्ट्रातील व्यवसायामुळे आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्याच्या अर्थव्यवस्थेत अंदाजे ५,९०० कोटी रुपयांची मूल्यवृद्धी झाली असून, ३६ हजार ९०० रोजगारांच्या संधींना आधार मिळाल्याचे स्वतंत्र सामाजिक-आर्थिक परिणाम मूल्यांकनातून समोर आले आहे. स्टुअर्ड रेडक्वीन या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार, कंपनीच्या मूल्यसाखळीचा प्रभाव उत्पादनापासून वितरण आणि किरकोळ विक्रीपर्यंत विस्तारला आहे. अहवालानुसार, संबंधित आर्थिक वर्षात महाराष्ट्रात यूबीएलच्या पेयांच्या २.३ कोटी केसची विक्री झाली. कंपनीच्या आर्थिक योगदानातून राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनातील (राज्य जीडीपी) अंदाजे ०.१ टक्के मूल्यवृद्धीला आधार मिळाला. यूबीएलच्या महाराष्ट्रातील मूल्यसाखळीत १,३०७ थेट रोजगारांचा समावेश आहे. याशिवाय पुरवठादार आणि संबंधित व्यवसायांमधून सुमारे ९,७०० रोजगार, तर वितरण आणि विक्रीशी संबंधित व्यवसायांमधून सुमारे २५,९०० रोजगारांच्या संधींना आधार मिळाल्याचा अभ्यासात अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

कंपनीतील प्रत्येक थेट रोजगारामागे व्यापक अर्थव्यवस्थेत आणखी २७ रोजगारांच्या संधींना आधार मिळत असल्याचेही अहवालात नमूद आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये यूबीएलने महाराष्ट्रातील पुरवठादारांकडून अंदाजे १,४०० कोटी रुपयांच्या वस्तू आणि सेवांची खरेदी केली. ही कंपनीच्या एकूण देशांतर्गत खरेदीच्या २० टक्के आहे. यामध्ये काचेच्या बाटल्या, डबे, मद्यनिर्मितीसाठी लागणारा कच्चा माल, वाहतूक, यंत्रसामग्री आणि व्यावसायिक सेवांचा समावेश आहे. कंपनीच्या संपूर्ण मूल्यसाखळीमुळे अंदाजे ४,२०० कोटी रुपयांच्या कर भरण्याला आधार मिळाल्याचे अहवालात म्हटले आहे. ग्राहकांनी कंपनीच्या पेयांवर खर्च केलेल्या प्रत्येक रुपयामागे अंदाजे ६३ पैसे करांच्या स्वरूपात सरकारकडे जात असल्याचा अभ्यासाचा निष्कर्ष आहे. व्यावसायिक योगदानासोबतच कंपनीने पर्यावरण संवर्धन आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम राबविल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे. 'प्रोजेक्ट ऑक्सिजन झोन'अंतर्गत पूर्वी कचरा टाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ४.९४ एकर जमिनीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. या ठिकाणी ८० पेक्षा अधिक प्रजातींची ५० हजार स्थानिक रोपे लावण्यात आली. तसेच दोन लाख लिटर क्षमतेचा पाणीसाठा तलाव आणि खोल चर विकसित करण्यात आले.

या प्रकल्पाचा २३ हजार ७०० हून अधिक लोकांना लाभ झाल्याचा दावा कंपनीने केला आहे. पाणी उपलब्धता, स्थानिक जैवविविधता आणि पर्यावरण संवर्धनाला या उपक्रमातून हातभार लागत असल्याचेही प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सशक्त नारी
समृद्ध समाज
उज्ज्वल भारत
आरंभपर्व -
नवदुर्गा
पुरस्कार २०२६
कर्तृत्ववान, प्रेरणादायी आणि समाजासाठी
योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान..!
नेतृत्व
व सामाजिक कार्य
शिक्षण
व ज्ञानप्रसार
आरोग्य
व सेवा
उद्योग
व रोजगारनिर्मिती
कला, क्रीडा
व संस्कृती
इतर प्रेरणादायी
योगदान
रविवार,
दिनांक १८ ऑक्टोंबर २०२६
वेळ :
सायंकाळी ४.०० वाजता
स्थळ :
(लवकरच जाहीर करण्यात येईल)
पुरस्कारासाठी आजच नोंदणी करा...
नोंदणीसाठी संपर्क
8605284272 | 72763 14142
समाजासाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या
महिलांना गौरविण्याचा विशेष उपक्रम